# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# डॉ. सोपानराव चव्हाण यांचा रविवारी वाढदिवस

**पाटण :** येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने



कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन सोहळा रविवार १२ रोजी दुपारी दोन वाजता आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने प्रा. डी. डी. चव्हाण लिखित 'ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण' या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा होणार आहे. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम सभागृहात माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.